पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक २८**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. १/१०/२०१९** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा**

**विषय क्र. १३३६**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ३ कार्यालयाचे नियंत्रणाखालील सिंहगडरोड, धनकवडी–सहकारनगर व वारजे–कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालयांकडील दि. १/८/२०१९ ते दि. ३१/८/२०१९ पर्यंतच्या कामकाजाचा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. उप आयुक्त, परिमंडळ क्र. ३ यांचे जा.क्र. उआप–३/३०८० दि.२१/९/२०१९ चे पत्र.

**माहितीसाठी आलेले विषय**

**विषय क्र. १३३७**

उप आयुक्त, (परिमंडळ विभाग क्र.१) पुणे महानगरपालिका यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.१ सप्टेंबर २०१९ ते दि.१५ सप्टेंबर २०१९ ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.१/६०५ दि.१९/९/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. १३३८**

क्षेत्रिय आयुक्त, परिमंडळ क्र. २ अधिनिस्त औंध–बाणेर, शिवाजीनगर–घोलेरोड व कोथरुड–बावधन क्षेत्रिय कार्यालयांकडील दि.१/८/२०१९ ते दि.३१/८/२०१९ अखेर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/क्षेआप२/६०७ दि.२१/९/२०१९ चे पत्र.

**सेवकवर्गाची प्रकरणे**

**विषय क्र. १३३९**

श्री.अंबरीश गालिंदे, सह महापालिका आयुक्त तथा मुख्य लेखा परिक्षक यांची पुणे महानगरपालिकेच्या संगणकीकरण विषयक कामकाजाचे समितीचे सदस्य म्हणून नियुक्ती केल्याची बाब निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/सामान्य प्रशासन/६१२ दि.२४/९/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. १३४०**

अधिनियमातील मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद तरतुदीनुसार मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडील 'कनिष्ठ अभियंता, वर्ग–३' या वर्गातील एकूण १० मंजूर पदांना मोटार सायकल भत्ता (पेट्रोल भत्ता) मे.शासन मान्यतेच्या दिनांकापासून अनुज्ञेय करणेस व तसा प्रस्ताव मे.राज्य शासनाचे मंजुरीस सादर करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/साप्रवि/आस्था–४/६१५ दि.२४/९/२०१९ चे पत्र.

**सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स**

**विषय क्र. १३४१**

प्रभाग क्र. ३३ ब स.नं.५७ वडगाव बुद्रुक गार्डन विकसीत करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडसपैकी ठेकेदार मे.ओम साई एंटरप्रायझेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ६५,८०,१९९=०९ पेक्षा ०.४३% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ६५,५१,९०४=२३ पर्यंत काम करून घेणेस व त्यानुसारचा जी.एस.टी. र.रू.७,८६,२२८=५०७, रॉयल्टी चार्जेस र.रू.१,१३,०७२/– व टेस्टिंग चार्जेस र.रू.१६,५३८/– पर्यंत अदा करणेस अधिक अटी शर्तीतील विशेष भाववाढ सुत्रानुसार दरात होणारी वाढ/घट त्यानुसार येणारी रक्कम ठेकेदारास आदा/वसूल करणे यांस अधिन राहून त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/उद्यान/६०४ दि.१९/०९/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. १३४२**

पंडित नेहरू स्टेडियम येथे स्थापत्य विषयक व दुरूस्ती विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडसपैकी ठेकेदार मे.सुराणा नरेंद्र फुलचंद यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४४,१६,७८३=४५ पेक्षा १.१०% तडजोडीने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ४३,६८,१९८=८४ उपलब्ध तरतुदी रकमेपर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी. र.रू.५,३०,०१४=०१ अधिक रॉयल्टी चार्जेस र.रू.१६,९६०=८० अधिक मटेरियल टेस्टिंग र.रू.१४,०७०/- अधिक निविदा अटी शर्तीनुसार सिमेंट, स्टील या विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रांनुसार फरक अदा/कपात करणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/६०६ दि.२१/०९/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. १३४३**

प्रभाग क्र. ३२ ड मध्ये विविध विकास कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.ईश्वरी असोसिएट्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ३५,७१,२१६=५० पेक्षा १.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३५,३५,५०४=३४ पर्यंत काम करून घेणेस व त्यानुसारचा जी.एस.टी. र.रू.४,२४,२६०=५२ पर्यंत अदा करणेस अधिक अटी शर्तीतील विशेष भाववाढ सुत्रानुसार दरात होणारी वाढ/घट त्यानुसार येणारी रक्कम ठेकेदारास आदा/वसूल करणे यांस अधिन राहून त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/उद्यान/६०८ दि.२१/०९/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. १३४४**

प्रभाग क्र. ३२ ड मध्ये उद्यान विभागामार्फत विविध विकास कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे.ईश्वरी असोसिएट्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ६२,४९,७५८=५० पेक्षा ११.०८% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ५५,५७,२८५=२६ पर्यंत काम करून घेणेस व त्यानुसारचा जी.एस.टी. र.रू.६,६६,८७४=२३ पर्यंत अदा करणेस अधिक अटी शर्तीतील विशेष भाववाढ सुत्रानुसार दरात होणारी वाढ/घट त्यानुसार येणारी रक्कम ठेकेदारास आदा/वसूल करणे यांस अधिन राहून त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/उद्यान/६०९ दि.२१/०९/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. १३४५**

पुणे महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा, एन डी स्कॉड, कर आकारणी व कर संकलन, आरोग्य व क्षेत्रिय कार्यालये व इतर विभागासाठी शासकीय कामासाठी भाडेतत्वावर टुरिस्ट परवाना असलेली जीप संवर्गातील वाहन घेणेसाठी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.स्वयंभू ट्रान्सपोर्ट, पुणे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रुपये१,००,००,०००/- पेक्षा ०% अॅटपार) असल्याने त्यांचेकडून काम करुन घेणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/६१० दि.२१/०९/२०१९ चे पत्र.

१) भाडेतत्वावर टुरिस्ट परवाना असलेली जीप संवर्गातील वाहने मे. स्वयंभू ट्रान्सपोर्ट, पुणे यांचेकडून त्यांचे टेंडर दराने (०% अॅटपार) एकूण रक्कम रुपये १,००,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक कोटी फक्त) पर्यंत घेणेस व त्यांचेबरोबर टेंडर अटी व शर्तीनुसार करारनामा करणेस,

२) प्रकरणी मे. स्वंयभू ट्रान्सपोर्ट, पुणे यांचेकडून आवश्यकतेनुसार घेण्यात आलेल्या भाडेतत्वावर टुरिस्ट परवाना असलेली जीप संवर्गातील नॉन एसी वाहनांचे दि.२५/०८/२०१९ पासुन केलेल्या कामाकरीता पश्च्यात मान्यता मिळणेस.

**टेंडर्स न मागविता ५(२)(२) अन्वये प्रकरणे**

**विषय क्र. १३४६**

महिंद्रा & महिंद्रा कंपनीच्या वाहनांची स्पेअरपार्टसह देखभाल दुरुस्ती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड प्रकरण ५ संविदा कलम २(२) नुसार मे. महिंद्रा & महिंद्रा या उत्पादक कंपनीचे अधिकृत विक्रेते/अधिकृत सर्व्हिस स्टेशन असलेले मे.सिल्व्हर ज्युबिली मोटर्स लि. पुणे यांचेकडून आवश्यकतेनुसार जस जसे लागतीत तस तसे प्रथम वर्ष करीता र.रुपये २०,००,०००/- (अक्षरी वीस लाख फक्त) व याप्रमाणे २ वर्ष कालावधी करीता एकूण र.रुपये४०,००,०००/- (अक्षरी चाळीस लाख फक्त) पर्यंत काम करुन घेणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मोवावि/६१९ दि.२४/९/२०१९ चे पत्र.

१) महिंद्रा & महिंद्रा लि.या उत्पादक कंपनीच्या वाहनांची महिंद्रा & महिंद्रा कंपनीचे अधिकृत विक्रेते/सर्व्हिस स्टेशन असणारे मे.सिल्व्हर ज्युबिली मोटर्स लि. पुणे यांचेकडून प्रति वर्ष करिता र.रुपये २०,००,०००/- (अक्षरी वीस लाख फक्त) व याप्रमाणे २ वर्ष कालावधी करीता एकूण र.रुपये४०,००,०००/- (अक्षरी चाळीस लाख फक्त) आवश्यकतेनुसार स्पेअरपार्टसह देखभाल दुरुस्ती उत्पादक कंपनीच्या प्रचलित स्पेअर पार्टस प्राईज लिस्ट (GST EXTRA AS APPLICABLE) व शेडयुल मान्य लेबर दराने (GST 18% EXTRA AS APPLICABLE) नुसार करुन घेणेस

२) सदरचे काम मे.महिंद्रा & महिंद्रा लि.या उत्पादक कंपनीच्या वाहनांसाठी मे.सिल्व्हर ज्युबिली मोटर्स लि. पुणे यांचेकडून करारनामा न करता व अनामत न घेता करुन घेणेस

३) सदर वाहनांचे देखभाल दुरुस्ती पोटी होणारे बिल मे.सिल्व्हर ज्युबिली मोटर्स लि. पुणे यांना ऑनलाईन पध्दतीने ईसीएस/आरटीजीएस/एनईएफटी/याद्वारे अदा करणेस

४) सदर कामासाठी खालील अंदाजपत्रकीय अर्थशीर्षकामधून पुरेशी तरतूद उपलब्ध असून उपलब्ध तरतुदीमधून खर्च करणेस

आर ई - २१ ए - १०३ ए

११.यांत्रिक क स्थापत्य अधिकारी

२ अ - सुटे भाग खर्च

५) सदर कालावधीमध्ये मे.महिंद्रा & महिंद्रा लि.या उत्पादक कंपनीच्या वाहनांची खरेदी झाल्यास त्यांची ही देखभाल दुरुस्ती सदर कालावधी मध्ये मे.सिल्व्हर ज्युबिली मोटर्स लि. पुणे यांचेकडून करुन घेणेस.

## मागील सभेचे विषय

**विषय क्र. १३४७**

मा. सौ.चाँदबी नदाफ यांचे दि. ११.०९.२०१९ चे पत्र

पुणे शहरातील प्रमुख ड्रेनेज लाईन मधील गाळ यांत्रिकी पंपाच्या हायड्रोलिक ग्रॅब मशिनच्या साहयाने काढणे कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे. अंकिता इंजिनिअर्स, पुणे यांचे एकच टेंडर आले असल्याने (पुर्वगणनपत्रक र.रु.६९,९७,२००/-) त्यांचेकडून रक्कम रु.६९,२७,२२८/- पर्यंत सर्व करांसह भाडेतत्वावर घेणेस व त्याकामी त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देण्यात येत आहे असा स्थायी समिति विषय क्र. ९३४ त्वर्य ठराव क्र. ९३४ मंजूर करण्यात आला असून या विषयाचा फेरविचार करण्यात यावा.

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. १३/९/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र.१३४८**

मा.गणेश ढोरे यांचे दि.९/९/२०१९ चे पत्र.

स्थायी समिती मान्य ठरावा द्वारे समाविष्ठ ११ गावात विद्युत विभागाच्या वतीने करावयाच्या विकास कामांच्या राखीव तरतुदीचे अन्य कामासाठी वर्गीकरण करण्यात आलेले आहे सदर स्थायी ठराव हा समाविष्ठ ११ गावातील नागरिकांना अन्याय करणारा आहे.शहरातील नब्याने समाविष्ठ प्रभागात पायाभुत सिविद्यांसाठी उपलब्ध निधी अन्य कामासाठी वर्गीकरण करणे ही खेदजनक व आझेपार्ह बाब आहे.एकीकडे डेकोरटीव्ह पोल शोभेच्या व अनावश्यक बाबीसाठी कोट्यावधी रुपये मनपा शहरातील वर्तमानपत्रांनी,नागरिकांनी आक्षेप घेतल्यावरही टेंडर प्रक्रिया राबविले आणि उलटपक्षी समाविष्ठ गावातील पायाभुत सुविद्यांसाठी राखीव तरतुद अन्य कामासांठी तरतुद करणे ही बाब शहराच्या सर्वांगिण विकासासाठी विसंगत व विकासाचा असमतोल निर्माण करणारी बाब आहे.

तरी सदर स्थायी समिती ठरावाचा फेरविचार करण्यात यावे.

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. १६/९/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १३४९**

पुणे, पेठ बाणेर स.नं. १०४/१, १०५/३ येथील पी.एम.टी. -१ आरक्षण क्षेत्र ७११५.०० चौ.मी. व पार्किंग (पी-७) आरक्षण क्षेत्र ४०००.०० चौ.मी. या आरक्षित जागेकरिता जागामालक सौ.इंदिरा शेट्टी यांनी पुणे म.न.पा.स महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम कलम १२७ अन्वये बजावलेल्या परचेस नोटीसचे अनुषंगाने भूसंपादनाची कार्यवाही सुरु करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शहर अभि./१३४० दि.११/२/२०१९ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. १६/९/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १३५०**

पुणे, पेठ बालेवाडी स.नं. ३४ (भाग) व ३५ (भाग) येथील उद्यान (जी-१) आरक्षण क्षेत्रापैकी ताब्यात आलेले क्षेत्र वगळून उर्वरित सुमारे २९९०५.०० चौ.मी. आरक्षित जागा भूसंपादन कायद्यानुसार ताब्यात घ्यावी लागणार आहे. तरी जागामालक देवी कन्स्ट्रक्शन तर्फे भागीदार श्री.विनोद बाणी यांनी पुणे म.न.पा.स महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम कलम १२७ अन्वये बजावलेल्या परचेस नोटीसचे अनुषंगाने भूसंपादनाची कार्यवाही सुरु करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/शअ/१६६७ दि.१८/३/२०१९ चे पत्र.
(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. १६/९/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १३५१**

अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभागामार्फत (घरपाडी विभागामार्फत) अनधिकृत बांधकामावर करणेत येणाऱ्या कारवायांची बिले कारवाई धारकांना पाठविताना आकारणी करावयाचे दर मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद तक्ता ड मध्ये चौरस फुटांप्रमाणे निश्चित करणेसाठी मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/अतिक्रमण/१११ दि.२७/६/२०१९ चे पत्र.
(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. १६/९/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १३५२**

१) मा.राजेंद्र शिळीमकर व मा.दिलिप वेडेपाटील यांचे दि. ९/७/२०१९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.४७५,दि.९/७/२०१९
३) मा.राजेंद्र शिळीमकर व मा.गोपाळ चिंतल यांची दि. १५/७/२०१९ ची उपसूचना
४) मा.मुख्य सभा ठराव क्र. २९८ दि.१५/७/२०१९

प्रभाग क्र.३६ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु. ५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, १०.ग.विद्युत विभाग, पान क्र. १००, अ.क्र. ४, शहरातील विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्था करणे, (यादी क्र. एसबी-५), पान क्र. २१६, अ.क्र. ४८१, कोथरुड विधानसभा मतदार संघात विद्युत विषयक कामे करणे | ५० लाख | --- |
| <u>नवीन सुचविलेली कामे</u><br>१) प्रभाग क्र.३६ ब, मध्ये अभ्यासिकेकरिता संगणक खरेदी करणे<br>२) प्रभाग क्र.३६ ब, मध्ये विविध ठिकाणी सी.सी.टि.व्ही.कॅमेरा बसविणे | <br>---<br>--- | <br>२५ लाख<br>२५ लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.
(टिप :- संदर्भ क्र. ४ नुसार सदरचा विषय मा.स्थायी समितीकडे परत पाठविण्यात आलेला आहे.)
(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. १६/९/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १३५३**

महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४९ अन्वये सादर झालेली खरेदी सुचना व मे.महाराष्ट्र शासनाने कायम करणेत आलेली परचेस नोटीस पुणे मनपाकडे दाखल होत असतात. त्यामुळे कलम १२७ चे बाबत मुख्य सभा ठराव क्र. ३४ दि.२२/६/२००६ च्या धर्तीवर कलम ४९ अंतर्गत खरेदी सूचना बाबत परचेस नोटीसचे अनुषंगाने भू-संपादन कार्यवाही करणेसाठी खालील प्रमाणे कार्यप्रणाली अवलंबिणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/शअ/१६६६ दि. १८/३/२०१९ चे पत्र.

१)मा.महापालिका आयुक्त यांनी परचेस नोटीस आल्याच्या दिनांकापासून एक महिन्यात विषयपत्र स्थायी समितीकडे सादर करणेस

२)मा.महापालिका आयुक्त यांचे विषयपत्र सादर झाल्यापासून एक महिन्यात मा.स्थायी समितीने मा.मुख्य सभेकडे शिफारस करणेस

३)मा. स्थायी समितीने जर एक महिन्यात निर्णय घेतला नाही तर मा.महापालिका आयुक्त यांनी सदरचा विषय मा.मुख्य सभेकडे पाठविणेस

४) मा.मुख्य सभेने जर याबाबत दोन महिन्याच्या मुदतीत निर्णय घेतला नाही तर मा.महापालिका आयुक्त यांनी परचेस नोटीसबाबत भूसंपादनाची कार्यवाही सुरु करणेस
(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. १६/९/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १३५४**

पुणे पेठ बालेवाडी स.नं. १७/५/५,१७/५/६ व १७/४/७ येथील प्ले ग्राउंड (पीजी-२) या आरक्षित जागेकरीता जागामालक श्री. बाबु हुलवंतराव मरलापल्ले , श्री. मंजुनाथ स्वामीराव मगनहल्ली व सौ. सरोज जवाहर पटेल यांनी पुणे म.न.पा स महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम कलम १२७ अन्वये बजावलेल्या परचेस नोटीसचे अनुषंगाने भूसंपादनाची कार्यवाही सुरू करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शअ/२०६ दि.८/८/२०१९ चे पत्र.
(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. १६/९/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १३५५**

पुणे, पेठ लोहगाव स.नं. १९८/१अ, सि.टी.सर्व्हे नं. ११० येथील नगर रोड (सी.टी.आर. ते नवीन मनपा हद्द) ६० मी.डी.पी. रस्त्याची आरक्षित ५५०.८७ चौ.मी. जागेचा टी.डी.आर. पोटी मालमत्ता व व्यवस्थापन या विभागामार्फत दि.१२/१०/२०१९ रोजी पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्यात आलेल्या एकूण ५५०.८७ चौ.मी. क्षेत्राची तडजोडीने ताबा घेवून भूसंपादनाची कार्यवाही पुर्ण झाली असल्याने चालू असलेल्या सदर मिळकतीचे क्षेत्र भूसंपादन कार्यवाहीतून वगळणेबाबत व तेवढया क्षेत्राची भूसंपादन कार्यवाही कायमस्वरुपी रद्द करणेबाबत मा.जिल्हाधिकारी, भूसंपादन शाखा, पुणे तसेच मा.विशेष भूमि संपादन अधिकारी क्र. १६, पुणे यांना कळविणेत येत असल्याची बाब अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भुसंपादन/२६० दि. २०/८/२०१९ चे पत्र.
(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. १६/९/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

## संकिर्ण

**विषय क्र. १३५६**

दस्त नोंदणी आय-सरिता प्रणाली व महानगरपालिका संगणकीय कर प्रणाली यांची जोडणी करणेसाठी खालीलप्रमाणे अवलंबवावयाचे कार्यपध्दतीस मान्यता मिळणेबाबत मा.महा. आयुक्त यांचे जा. क्र.मआ/करआकरसंक/६१३ दि.२४/९/२०१९ चे पत्र.

१) नाव हस्तांतरण प्रणालीमध्ये आवश्यक बदल व संगणक प्राणाली विकसित करणे या बाबतही कार्यवाही मिळकतकर विभाग व आय-सरिता (NIC) मार्फत करणे.

२) खरेदी, वारस व बक्षिसपत्राप्रमाने नाव हस्तांतरणापासून होणारी फी मिळकतकर संगणकीय प्रणालीमार्फत पुरविण्यात येईल. व ती फी 'ऑनलाईन पेमेंट गेटवे' द्वारे स्वीकारणे करीता पेमेंट गेटवे सोबत संगणकीय प्रणालीची जोडणे करणे आवश्यक आहे. 'ऑनलाईन पेमेंट गेटवे' द्वारे फी स्वीकारून दैनंदिन स्क्रोल तयार करून जमा रक्कमेची खातरजमा करणेस,

३) मिळकतकर बिलावरील नाव हस्तांतरणाबाबत मा.महा. आयुक्त यांचे विषयपत्रामधील 'ब' तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे आवश्यक कागदपत्रे नोंदणी व मुद्रांक शुल्क कार्यालयाने अर्जदराकडून घेऊन व त्यांची खातरजमा करून मा.महा. आयुक्त यांचे विषयपत्रामधील 'अ' तक्त्यात मा. स्थायी समिती ठराव क्र. २३९९ दि. ३१/०३/२०१५ अन्वये मान्य दराप्रमाणे अथवा मा.स्थायी समिती वेळोवेळी ठरवील त्या दराप्रमाणे फी स्वीकारले नंतर नाव हस्तांतरण बाबत कार्यवाही करण्यास.

४) प्रथम मिळकतकरधारकाने मिळकतीची विक्री केली आहे तथापि द्वितीय मिळकतधारकाने मिळकतीचे बिलावर नाव हस्तांतरण न करता तृतीय अथवा त्यापुढील व्यक्तीस मिळकतीची विक्री केलेनंतर तृतीय अथवा त्यापुढील मिळकतधारकाने मिळकतकराचे बिलावर नाव हस्तांतरण बाबत अर्ज सादर केलेनंतर नोंदणी व मुद्रांक शुल्क कार्यालयाने दुप्पट अथवा त्यापटीत हस्तांतरण फी स्वीकारणे आवश्यक आहे.

५)संबंधित मिळकतधारक यांनी नोंदणीचेवेळी नाव हस्तांतरणाचे अनुषंगाने सर्व कागदपत्रे व संपूर्ण फी पुणे महानगरपालिकेकडे जमा झाल्यानंतर नाव हस्तांतरण प्रमाणपत्र पुणे महानगरपालिका कार्यालयाकडून अर्जदारास/ मिळकतकरधारकास प्रदान करणेस

६) दस्त नोंदणी आय-सरिता प्रणाली व महानगरपालिका संगणकीय कर प्रणाली यांची जोडणी करिता पुणे महानगरपालिकेतर्फे नोडल ऑफिसर म्हणून मा.सह महापालिका आयुक्त तथा कर आकारणी व कर संकलन प्रमुख यांची नियुक्ती करणेस. (भ्रमणध्वनी क्र. ९६८९९३११८१)

**विषय क्र. १३५७**

मे.महाराष्ट्र राज्य सरकार व म्युनीसीपल कर्जरोखे धारण करणार यांचे माहितीकरिता दि. ३१/३/२०१८ अखेर पुणे महानगरपालिकेने देणे असलेल्या कर्जाच्या रकमांचे व कर्जबाकीसंबंधी इतर माहिती दर्शविणारे तक्ते सरकारी गॅझेटमध्ये प्रसिध्द करणेस व त्यांच्या प्रती मे.महाराष्ट्र सरकार व मा.अकौंटंट जनरल, मुंबई यांचेकडे पाठविण्याची अलहिदा तजवीज करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/६१४ दि. २४/९/२०१९ चे पत्र.

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**